जा.क्र./प्राधि/शा.प./२०२४/ 234 /प्र.११
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व ), मुंबई -४०००५१
दिनांक :- 01 FEB 2024

प्रति,

१) मा. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मा. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ/मुं. इ. दु. व पु. मंडळ,
३) मुख्य अभियंता-१/२/३/प्रा.
४) विधी सल्लागार/प्रा.
५) वित्त नियंत्रक /प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.
७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
८) मुख्य अधिकारी, मुं. झो. सु. मंडळ/कोकण मंडळ/पुणे मंडळ
नाशिक मंडळ/नागपूर मंडळ/औरंगाबाद मंडळ/अमरावती मंडळ,
९) चौकशी अधिकारी /प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी-१/२/प्रा.
११) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा.
१२) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.

**विषय** :-प्रसुती रजा संदर्भात सेवा कालावधीची अट वगळण्याबाबत.

**संदर्भ** :- प्राधिकरणाचे पत्र क्र. संकिर्ण/प्राधि/२०१६/८४८/प्र.१३ दि. १८/०२/२०२६ अन्वये निर्गमित झालेला शासन निर्णय क्रमांक : प्ररजा-२०१५/प्र.क्र.२५/सेवा-६ दि.१५/०१/२०१६.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधिन शासन निर्णयानुसार दोन वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या म्हाडातील महिला कर्मचाऱ्यांना प्रसुती रजा मंजूर करणेपूर्वी त्यांचेकडून सोबत जोडलेला शपथपत्राचा नमुना ५००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर घेऊन त्यांची प्रसूती रजा मंजूर करण्यात यावी.

महिला कर्मचाऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या शपथपत्राचा सुधारित नमुना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

31.1.24

(राजकुमार सागर)
सचिव/प्राधिकरण

सोबत - सुधारित शपथपत्राचा नमुना

30/1/24 30/1/2024.

प्रशासन-११,१४/प्रा.

# शपथपत्र

श्रीमती-----------------------------------------------------पद-------------------------------------

कार्यालयाचे नाव -------------------------------येथे दि. --------------- पासून कार्यरत आहे. शासन निर्णय क्र. प्ररजा २०१५/प्र.क्र.२५/सेवा-६, दिनांक ---------------- अन्वये प्रसुती रजा संदर्भात सेवा कालावधीची अट वगळण्यात आल्याने तसेच सदर शासन निर्णयानुसार प्रसुती रजा देय असल्याने सदर मागणी केल्यानुसार ६ महिन्यांच्या वेतना इतकी रक्कम रु. --------------/- रु. (अक्षरी)------------------------------------------ फक्त) देण्यास बांधील आहे.

खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून बंधपत्र देण्याचे मान्य करीत आहे.

१) प्रसूती रजा मंजूर करण्यापूर्वी ६ महिन्यांच्या वेतना इतक्या रकमेचा बॉन्ड शासकीय महिला कर्मचाऱ्याकडून घेण्यात यावा. तद्नंतरच उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे प्रसूती रजा व रजा वेतन अनुज्ञेय राहील.

२) अशा शासकीय महिला कर्मचाऱ्याने प्रसूती रजा संपवून शासन सेवेत रुजू झाल्यानंतर किमान दोन वर्षे राज्य शासनाची सेवा करणे बंधनकारक राहील. सेवेचा दोन वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी प्रसूती रजा कालावधीत प्रसूती रजेनंतर रुजू न होता/प्रसूती रजा संपवून रुजू झाल्यावर राज्य शासना व्यतिरिक्त/राज्याच्या एकत्रित निधीतून वेतनावरील खर्च भागविला जात नाही अशा इतर सेवेत जाण्याकरीता प्रकरणपरत्वे कार्यमुक्त व्हावयाचे झाल्यास/राजीनामा द्यावयाचा झाल्यास अथवा अन्य कारणास्तव राजीनामा द्यावयाचा झाल्यास अशा शासकीय महिला कर्मचाऱ्याने घेतलेल्या प्रसूती रजा कालावधीत देय झालेल्या वेतनाइतके वेतन राज्य शासनास अदा केल्यानंतरच अशा शासकीय महिला कर्मचाऱ्यास राज्य शासनाच्या सेवेचा राजीनामा देता येईल किंवा कार्यमुक्त होता येईल.

मी सदर शासन निर्णयातील अटींची पूर्तता न केल्यास/उल्लंघन केल्यास रक्कम रु. ------------------/- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास परत देण्यास बांधिल आहे किंवा प्राधिकरणामार्फत ती वसूल करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

दिनांक - ---------------- नाव- -------------------------------------------

ठिकाण - ---------------- सही- --------------------------------------------

साक्षीदार

१.---------------------------------------

२.---------------------------------------

प्रति-१

प्रसुती रजा संदर्भात सेवा कालावधीची अट
वगळण्याबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : प्ररजा-२०१५/ प्र.क्र.२५/ सेवा-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १५ जानेवारी, २०१६.

वाचा : १) शासन निर्णय वित्त विभाग, क्र अरजा१४९०/१२/सेवा ९, दि. २८.०७.१९९५
२) शासन शुध्दीपत्र, वित्त विभाग, क्र अरजा१४९०/१२/सेवा ९, दि. २८.०७.१९९५
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अरजा-१४०१/प्र.क्र. ८/०९/सेवा-६, दि.२४.८.२००९

प्रस्तावना :

प्रसुती रजेसंदर्भातील तरतुदी महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम, १९८१ मधील नियम ७४ मध्ये करण्यात आल्या आहेत. सदर नियमातील नियम ७४ (२)(ए) नुसार कायम सेवेत नसलेल्या तथापि दोन वर्षे किंवा अधिक वर्षे सतत सेवा झालेल्या महिला शासकीय कर्मचाऱ्यांस नियम ७४(१ ) प्रमाणे प्रसुती रजा अनुज्ञेय आहे तसेच प्रसुती रजेच्या कालावधीत रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी तिला जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन अनुज्ञेय आहे.

सदर नियमातील नियम ७४ (२)(बी) नुसार कायम सेवेत नसलेल्या एक वर्षापेक्षा अधिक परंतु दोन वर्षापेक्षा कमी सतत सेवा झालेल्या महिला शासकीय कर्मचाऱ्यांस नियम ७४(१) प्रमाणे प्रसुती रजा अनुज्ञेय आहे. प्रसुती रजेच्या कालावधीत रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी तिला जेवढे वेतन मिळत असेल त्या रकमेच्या निम्मी रक्कम रजा वेतन म्हणून अनुज्ञेय आहे.

एक वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास प्रसुती रजा कालावधीत प्रसुती रजा अनुज्ञेय होत नाही व कोणत्याही प्रकारचे रजा वेतन अनुज्ञेय नाही. परंतु प्रसुतीच्या कारणास्तव (वैद्यकीय कारणास्तव) तिच्या खाती असलेली अनुज्ञेय रजा/ असाधारण रजा घेता येते. त्यामुळे शासन सेवेत भरतीच्या मान्यताप्राप्त माध्यमाने रुजु झालेल्या महिला कर्मचाऱ्यांकरीता पूर्णवेतनी प्रसुती रजा अनुज्ञेय होण्यासाठी सेवा कालावधीची अट रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४(२)(ए) व (बी) मधील किमान सेवेची अट रदद करण्यात येत असून राज्य शासनाच्या सेवेत भरतीच्या मान्यताप्राप्त माध्यमाने रुजु झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास संदर्भाधीन दि.२४.०८.२००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार असलेली प्रसुती रजा अनुज्ञेय राहिल व प्रसुती रजेच्या कालावधीत रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी तिला जेवढे वेतन मिळत असेल त्याप्रमाणे रजा वेतन अनुज्ञेय राहिल. अशी रजा, रजा खाती खर्ची टाकण्यात येणार नाही. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास सदर प्रसुती रजा व रजा वेतन खालील शर्तीच्या अधीन राहून अनुज्ञेय राहिल:-

१) प्रसुती रजा मंजूर करण्यापुर्वी ६ महिन्यांच्या वेतनाइतक्या रकमेचा बॉन्ड अशा शासकीय महिला कर्मचाऱ्याकडून घेण्यात यावा, तद्नंतरच उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे प्रसुती रजा व रजा वेतन अनुज्ञेय करण्यात यावे.

२) अशा शासकीय महिला कर्मचाऱ्याने प्रसूती रजा संपवून शासन सेवेत रुजू झाल्यानंतर किमान दोन वर्षे राज्य शासनाची सेवा करणे बंधनकारक राहील. सेवेचा दोन वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी, प्रसुती रजा कालावधीत /प्रसुती रजेनंतर रुजू न होता /प्रसुती रजा संपवून रुजु झाल्यावर, राज्य शासनाव्यतिरिक्त /राज्याच्या एकत्रित निधीतून वेतनावरील खर्च भागविला जात नाही अशा इतर सेवेत जाण्याकरीता प्रकरणपरत्वे कार्यमुक्त व्हावयाचे झाल्यास/ राजीनामा द्यावयाचा झाल्यास अथवा अन्य कारणास्तव राजीनामा द्यावयाचा झाल्यास अशा शासकीय महिला कर्मचाऱ्याने घेतलेल्या प्रसुती रजा कालावधीत देय झालेल्या वेतनाइतके वेतन राज्य शासनास अदा केल्यानंतरच अशा शासकीय महिला कर्मचाऱ्यास राज्य शासनाच्या सेवेचा राजीनामा देता येईल किंवा कार्यमुक्त होता येईल.

२. या सुविधेचा लाभ आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहिल.

३. या शासन निर्णयातील तरतुदीपुरते महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील यासबंधीच्या विद्यमान तरतुदी सुधारण्यात आल्या आहेत, असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

प्रती-3

४.  सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०११६११२८०९४६०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vidya Hemant Waghmare

Digitally signed by Vidya Hemant Waghmare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=f93efe7b946bf26ff989d6e5e01e1b122b9eb4e3e4e6799cb8e82b2d33d58dfc, cn=Vidya Hemant Waghmare
Date: 2016.01.16 11:34:53 +05'30'

**(विद्या वाघमारे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन , मुंबई
५) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
६) मंत्रालयीन सर्व विभाग
७) मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
८) * प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
९) * प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१०)* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
११)* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१२)* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१३)* आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
१४)* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१५)* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१६) महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१७) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
१८) महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
१९) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
२०) सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
२१) सर्व विभागीय आयुक्त
२२) सर्व जिल्हाधिकारी
२३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
२४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२७) जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,
२८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२९) सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक,
३०) मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
३१) मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
३२) कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहूरोड/देवळाली/अहमदनगर
३३) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
३४) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.,बॅरेक क्रमांक-१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई-२०
३५) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई-४
३६) भारतीय कम्युनिस्ट पार्टी,(मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
३७) इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय)समिती, टिळक भवन. काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
३८) नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई-२१
३९) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
४०) वित्त विभागातील सर्व कार्यासन
४१) निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

* पत्राने